# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२

क्र./आस्था/३१५५/२०१६ | दि. : २७/१२/२०१६

## परिपत्रक

**विषय**:– दि. ०१ जानेवारी २०१७ ते १५ जानेवारी २०१७ हा कालावधी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** म्हणून साजरा करण्याबाबत.

संदर्भ:– १.उच्च शिक्षण संचालनालय,पुणे यांचे पत्र क्र. उशिस/२०१६ भाषा पंधरवाडा/मवि–१/१४२८६, दि. १६/१२/२०१६.
२.शासन पत्र क्रं. मभाप–२०१६प्र.क्र.११८/भाषा–२, दि.०५/१२/२०१६.
३.शासन परिपत्रक क्रं.मभापं–२०१६/प्र.क्र.११८/भाषा–२, दि. ०३/१२/२०१६.

विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, संदर्भिय क्रं. १ चे शासनपत्रानुसार मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी प्रतिवर्षी दि. ०१ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** साजरा करण्याचा निर्णय शासन निर्णय दि. २२/०७/२०१५ अन्वये घेतलेला आहे. संदर्भिय परिपत्रक क्रं.३ मध्ये नमुद केल्यानुसार शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांत भाषा संवर्धनाकरिता विविध परिसंवाद/व्याख्याने/स्पर्धा/कार्यशाळा/शिबिर यांचे आयोजन करण्याबाबत तसेच वाचन संस्कुती वाढीस लागावी या करिता तंज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन त्याचबरोबर ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, काव्य वाचन इत्यादी कार्यक्रमाचे आपल्या स्तरावर आयोजन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर तसेच विद्यापीठास सादर करण्यात यावे. आपल्या महाविद्यालयाकडून अहवाल प्राप्त न झाल्यास सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. करिता योग्य कार्यवाहीस्तव सादर.

**सहपत्र संलग्न**:–
उपरोक्त शासनाचे संलग्नीत संदर्भिय पत्र.

( दिपक एस. जुनघरे )
कुलसचिव(का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन क्र.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स क्र. ०२०/२६१११३५३

क्र.उशिसं/२०१६/मराठी भाषा पंधरवडा /मवि-१ १९४२८ दिनांक-१६/१२/२०१६

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

२) विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

आवक 5419 19/12/16 6565 19/12/16
जावक क्र............दि............

**विषय :- राज्यामध्ये दिनांक १ जानेवारी २०१७ ते १५ जानेवारी २०१७ हा कालावधी " मराठी भाषा संवर्धन पंधरवडा " म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :- १) शासन पत्र क्र. मभापं-२०१६/प्र.क्र.११८/भाषा-२, दि.०५.१२.२०१६**
**२) शासन परिपत्रक क्र. मभापं-२०१६/प्र.क्र.११८/भाषा-२, दि.०३.१२.२०१६**

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी , तिचे संवर्धन करण्यासाठी प्रतिवर्षी दि.०१ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी " **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** " म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासन निर्णय दि.२२.०७.२०१५ अन्वये घेतलेला आहे.

वरील संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकांत नमूद केल्यानुसार शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांत भाषा संवर्धनाकरिता विविध परिसंवाद / व्याख्याने / स्पर्धा / कार्यशाळा / शिबिर यांचे आयोजन करण्याबाबत तसेच वाचन संस्कृती वाढीस लागावी या करिता संबंधित तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन त्याचबरोबर ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, काव्य वाचन इत्यादींचे आयोजन करण्याचे निर्देशित केलेले आहे.

उपरोक्त कार्यक्रमांचे आयोजन करून " **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** " साजरा करण्याकरिता आपल्या अधिनस्त शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांना सूचना निर्गमित करण्यात याव्यात. सदर बाबत महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित सहसंचालक कार्यालयास सादर करावा. (महाविद्यालयांनी या संचालनालयास अहवाल पाठवू नयेत. ) विभागीय सहसंचालकांनी आपल्या अधिनस्त महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

Dr. Dube DR

(डॉ. वि. रा. मोरे)
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

सोबत-
संदर्भ क्र.१ व २ ची प्रत

प्रत-
१)मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. नंदा राऊत, अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) प्राचार्य , सर्व महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.- उचित कार्यवाही करावी.

महाराष्ट्र शासन

- 9 DEC 2016
२८८०४
भवि-१

क्रमांक : मभापं-२०१६/प्र.क्र.११८/भाषा-२,
मराठी भाषा विभाग,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०५ डिसेंबर, २०१६

प्रति,

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य,
पुणे

**विषय :- राज्यामध्ये दिनांक १ जानेवारी, २०१७ ते १५ जानेवारी, २०१७ हा कालावधी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणून साजरा करण्याबाबत**

संदर्भ :- समक्रमांकाचे दिनांक ३ डिसेंबर,२०१६ चे परिपत्रक

महोदय / महोदया,

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करण्यासाठी प्रतिवर्षी दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** म्हणून साजरा करण्याचा निर्णय दि.२२.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. याबाबतच्या सूचना संदर्भाधीन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर परिपत्रकात दिलेल्या सूचनांनुसार आपल्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था यांना मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत आपल्या स्तरावर सविस्तर सूचना देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी, ही विनंती.

आपली विश्वासू,

( नंदा राऊत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरील प्रमाणे

D:\भाषा-२\सन 2016\प्र.क. 118 2016 - पंधरवडा परिपत्रक.docx

दिनांक १ जानेवारी ते दिनांक १५ जानेवारी,२०१७ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः- मभापं-२०१६/प्र.क्र.११८/भाषा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०३ डिसेंबर, २०१६

वाचा:- मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक-मभापं-२०१५/प्र.क्र.७०/भाषा-२, दिनांक २२ जुलै,२०१५.

## शासन परिपत्रक

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी प्रतिवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचा निर्णय संदर्भाधीन दिनांक २२ जुलै,२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/मंडळे/सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये इत्यादी सर्व संस्थांनी दिनांक १ जानेवारी,२०१७ ते १५ जानेवारी, २०१७ या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्याबाबत पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(१) राज्यामध्ये मराठी भाषेचा राजभाषा म्हणून सार्वत्रिक वापर करण्याच्या दृष्टीने सदर पंधरवड्यात सर्व संस्था / कार्यालये यांनी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करावे. यामध्ये सर्व मंत्रालयीन विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालये/ महामंडळे / स्थानिक संस्था, राज्यातील केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये / महामंडळे / उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका यांनी सक्रीय सहभाग घ्यावा.

(२) सर्व मंत्रालयीन विभागांनी आपले कार्यालय व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांना **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** साजरा करण्याबाबत सविस्तर आदेश द्यावेत.

(३) सर्व शाळा व महाविद्यालये यांनी त्यांच्या स्तरावर सदर पंधरवड्यात भाषा संवर्धनाकरिता विविध परिसंवाद / व्याख्याने / स्पर्धा / कार्यशाळा / शिबिर यांचे औचित्यपूर्ण आयोजन करावे.

(४) मराठी वाचन संस्कृती वाढावी यादृष्टीने संबंधित तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन तसेच ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, काव्य वाचन इत्यादींचे आयोजन करावे.

(५) राज्यातील अमराठी भाषिकांना मराठी भाषेचा सुलभ पध्दतीने परिचय करुन देण्याच्या दृष्टीने कार्यशाळा / स्पर्धा इत्यादीचे आयोजन करावे.

(६) त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारितील सर्व कार्यालये / मंडळे / सार्वजनिक उपक्रम यांनी मराठीचा वापर करणे अनिवार्य आहे. तरी याबाबतची जागरुकता निर्माण करण्याकरिता सदर कार्यालयांनी या पंधरवड्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करावे.

(७) सर्व खाजगी बँका / व्यापारी बँका यांनी आपापल्या कार्यालयांतर्गत मराठी भाषेसंबंधी वैविध्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करावे.

(८) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयंनी आपल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून याबाबतचे संदेश प्रसारित करावेत.

या कार्यक्रमासाठी येणारा खर्च प्रत्येक वित्तीय वर्षात त्या त्या संबंधित विभागाने / कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चातून मंजूर होणाऱ्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६१२०३१६५११८८४३३ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Leena Vivek Dhuru

Digitally signed by Leena Vivek Dhuru
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Leena Vivek Dhuru
Date: 2016.12.03 16:53:03 +05'30'

(लिना वि. धुरु)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
५) कुलगुरु, सर्व विद्यापीठे,
६) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई (पत्राने),
७) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
८) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई